N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** वर्धा  **P.S.(ठाणे):** हिंगणघाट
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 1668  **Year (वर्ष):** 2025
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 13/11/2025 10:48

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** दरमियानी दिन
**Time Period (कालावधी):**
**Date From (दिनांक पासून):** 06/11/2025
**Date To ( दिनांक पर्यंत):** 12/11/2025
**Time From (वेळेपासून):** 11:00 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 11:34 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 13/11/2025  **Time (वेळ):** 05:00 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 011
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 13/11/2025 10:48 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पूर्व, 02 किमी  **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** नंदोरी चौक उड्डाण पुलाखाली,हिंगणघाट

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** पो.नि. संदिप अनंत मुपडे

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1982

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग वर्धा,वर्धा,वर्धा,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग वर्धा,वर्धा,वर्धा,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9975337552

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | बाबाराव उत्तमराव नाईक | | | 1. रमाई बालोद्द्यान समता नगर, सावंगी मेघे,वर्धा,सवंगी मेघे पोलिस स्टेशन,वर्धा,महाराष्ट्र, भारत |
| 2 | संकेत घनश्याम विटाळे | | | 1. सावली वाघ,हिंगणघाट, हिंगणघाट,वर्धा,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रानिक सामान | मोबाईल फोन | आलोसे यांचा विवो कंपनीचा जुना वापरता मोबाईल | 8,000.00 |
| 2 | इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रानिक सामान | मोबाईल फोन | खाजगी इसम यांचा रेडमी कंपनीचा जुना वापरता मोबाईल | 6,000.00 |
| 3 | कागदपत्रे आणि मुल्यवान रोखे | इतर कोणतीही कागदपत्रे | आलोसे यांच्या ब्यागमध्ये मिळुन आलेले तक्रारदार यांच्या प्रलंबित कामाचा तपासणी अहवाल 02 पाने | 0.00 |
| 4 | वाहने आणि इतर | मोटर साइकल | आलोसे यांनी गुन्ह्यात वापरलेले होंडा कंपनीची एस.पी. शाईन क्र. एम.एच.32ए.एल.7595 | 35,000.00 |
| 5 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500 रु दरच्या 02 चलनी नोटा | 1,000.00 |
| 6 | इतर | घरगुती वस्तु | आलोसे यांनी परिधान केलेले काळ्या रंगाचे स्वेटर | 0.00 |
| 7 | इतर | घरगुती वस्तु | आलोसे यांनी परिधान केलेले फुल बाहिचे पांढऱ्या रंगाचे शर्ट | 0.00 |
| 8 | इतर | संकीर्ण/विविध | लाच मागणी पडताळणी व सापळा कारवाई मधिल 32 जी.बी. क्षमतेचे Sandisk कंपनीचे 06 मेमरी कार्ड | 0.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

50,000.00

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):
नक्कल लेखी रिपोर्ट सोबत जोडलेल्या फाईलमधिल मजकुराप्रमाणे

फिर्याद लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,वर्धा.दिनांक 13/11/2025 मी श्री. संदीप मुपडे पोलीस निरीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग वर्धा दिनांक 05/11/2025 रोजी सायंकाळी 16.49 वाजता आम्ही कार्यालयात हजर असतांना आमचे मोबाईल क्रमांक 9975337552 वर तक्रारदार यांचा मोबाईल क्रमांक 8329269015 वरुन फोन करुन श्री. सुरेश दत्तात्रय निकोरे, वय 41 वर्ष, व्यवसाय शेती, रा. संत ज्ञानेश्वर वार्ड, शाहलंगडी रोड, हिंगणघाट तह. हिंगणघाट जि. वर्धा, मो.नं. 9404553132,8329269015 यांनी माझे फोन वर माहीती दिली की एका लोकसेवकाविरूध्द लाच मागणी असल्याने दिनांक 06/11/2025 रोजी सकाळी 11.00 वाजता दोन शासकीय पंचांना बोलावले. त्यानंतर आम्ही दोन शास्कीय पंच व सापळा पार्टीतील सदस्यांसह शासकिय वाहणाने रवाना होवुन तक्रारदार यांना दोन्ही शासकीय पंचांचा व सापळा पार्टीतील सदस्यांचा परीचय करुन दिला व

तक्रारदार यांनी त्यांची लेखी तक्रार लिहुन दिली. तक्रारदार यांनी दिलेली लेखी तक्रार खालील प्रमाणे आहे. दिनांक: - 06/11/2025प्रति, मा. पोलीस उप-अधिक्षक साहेब,लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय,वर्धा अर्जदार - श्री सुरेश दत्तात्रय निकोरे, वय 41 वर्ष, व्यवसाय शेती, रा. संत ज्ञानेश्वर वार्ड, शाहलंगडी रोड, हिंगणघाट तह. हिंगणघाट जि. वर्धा, मो.नं. 9404553132,8329269015
विषय:- एक लोकसेवक लाचेची मागणी करीत असल्याबाबत.महोदय,मी हिंगणघाट येथील नांदगांव रोडवरील कृषी विभागाचे बंद असलेल्या गोडावुन जवळ समक्ष हजर येवुन माझी लेखी तक्रार आपणाकडे देतो की, मी वरील पत्यावर माझे कुटुंबासह राहत असुन माझेकडे मौजा शेगाव (कुंड) येथे 1.21 हेक्टर शेत जमिन असुन ती शेत जमीन मी वाहतो. मी राज्य कृषी यांत्रीकीकरण योजना अंतर्गत कडबा कुटीयंत्र (चापकटर) हे यंत्र शासकिय अनुदान मिळण्यासाठी दिनांक 07/09/2025 रोजी ऑनलाईन अर्ज maha dbt पोर्टलवर केला होता. त्याचा अर्ज क्र. 252620000770254 त्यानंतर मला दिनांक 12/10/2025 रोजी पुर्वसंमती मिळालेबाबत माझ्या मोबाईल क्रमांकावर मॅसेजव्दारे माहीती मिळल्याने मी दिनांक 29/10/2025 रोजी कडबा कुटीयंत्र हे वर्धा येथील इनसाईड इक्युपमेंट येथुन 37,520/- रूपयामध्ये यंत्रखरेदी केला त्यानंतर मी दिनांक 02/11/2025 रोजी maha dbt पोर्टलवर यंत्र खरेदीचे बिल, बँक स्टेटमेंट रोजी अपलोड केले होते.त्यानंतर दिनांक 04/11/2025 रोजी माझे राहते घरी तालुका कृषी पर्यवेक्षक श्री नाईक साहेब हे दुपार दरम्यान यंत्र पाहणी तसेच तपसणी अहवाला करीता आले त्यानंतर त्यांनी यंत्र पाहणीकरून त्याचे फोटो काढुन मला तुम्हाला कडबा कुटी यंत्राची शासनाकडुन जास्तीत जास्त सबसिडी मिळवुन देतो त्यासाठी मला पैसे दयावे लागतील असे म्हणुन लाच मागणी ची ईच्छा दर्शविल्याने मी त्यांना विचारले किती रूपये दयावे लागतील माझे जवळ 200/- रूपये आहेत असे म्हटल्यावर येवढे पैसे माझ्या पेट्रोल पुरत नाही असे म्हणुन या पेक्षा जास्त लाच रक्कम पाहीजे असल्याची मागणी केली. त्यावेळी माझे कडे 200/रु. पेक्षा जास्त पैसे नव्हते तसेच श्री नाईक साहेब यांनी मला आज लाच मागणी अनुषंगाने भेटायला बोलाविले आहे परंतु मला त्यांना लाच देण्याची मुळीच ईच्छा नसल्याने त्याचे विरूध्द माझी रीतसर कायदेशीर तक्रार असुन या पुर्वी माझे त्यांचे सोबत कोणत्याही प्रकारची आर्थिक देवाण घेवाण झालेली नसुन कोणतेही वैमनस्य नाही.तरी लोकसेवक श्री नाईक, तालुका कृषी पर्यवेक्षक, हिंगणघाट जि. वर्धा यांचेवर कायदेशीर कार्यवाही होणेस मी माझी लेखी तक्रार देत आहे. ठिकाण - ता. हिंगणघाट जि. वर्धा दिनांक:- 06/11/2025 सही इंग्रजीत सुरेश दत्तात्रेय निकोरे रा. हिंगणघाट जि. वर्धा अशी तक्रारदार यांनी त्यांची लेखी तक्रार दिली सदरची तक्रार आम्ही वाचुन दोन्ही पंचांना वाचण्यास दिली दोन्ही पंचांनी सदरची तक्रार वाचुन कागदपत्रे पाहुन तक्रारदार यांचे तक्रारीवर तसेच तक्रारी सोबत दिलेल्या कागदपत्रांवर स्वाक्षरी केली तसेच आम्ही सुध्दा स्वाक्षरी केली. त्यानंतर आम्ही दिनांक 06/11/2025 तक्रारदार यांनी तक्रारीत नमुद केल्याप्रमाणे गै.अ. श्री नाईक, कृषी पर्यवेक्षक यांची लाच मागणी बाबत पडताळणी करणे असल्याने तक्रारदार व दोन्ही पंच यांना व्हाईस रेकॉर्डर व अँन्थ्रासीन पावडर यांचे गुनधर्माविषयी माहिती देण्यात आली. त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना गै.अ. श्री. नाईक यांची भेट कुठे होईल या बाबत विचारणा केली असता तक्रारदार यांनी गै.अ. श्री. नाईक यांची भेट त्यांचे मंडळ कृषी अधिकारी कार्यालय हिंगणघाट येथे होईल असे सांगीतले. त्यावरुन आम्ही तक्रारदार व पंच क्र. 1 यांना गै.अ. यांचे भेटीस रवाना करुन तक्रारदार यांना गै.अ. यांनी खरच लाच मागणी केली किंवा कसे या बाबत पडताळणी करण्याचा निर्णय घेवुन वेळ 14.25 वा सुरु करुन तक्रारदार यांना योग्य सुचना देवुन रवाना केले. त्यानंतर तक्रारदार हे थोडया वेळाने परत आले. त्यानंतर आम्ही व्हाईस रेकॉर्डर पंच क्र. 1 यांचे आवाजामध्ये बंद करुन पंच क्र. 1 यांना विचारणा केली असता पंच क्र. 1 यांनी सांगीतले की, गै.अ. हे त्यांचे कार्यालयामध्ये हजर नव्हते. तक्रारदार यांनी कार्यालयातील एका महिलेशी विचारपुस केली असता गै.अ. हे मिटींग करीता जाम येथे गेले असल्याबाबत सांगीतले. तक्रारदार यांनी गै.अ. यांचे मोबाईल क्रमांकावर कॉल केला असता त्यांनी कॉल रिसीव्ह केला नसल्याने आम्ही थांबुन असलेल्या ठिकाणी परत आलो असल्याचे पंच क्र. 1 यांनी घटनाक्रम कथन केला. त्यानंतर आम्ही पडताळणी दरम्यान रेकॉर्ड झालेले संभाषण ऐकले असुन संविस्तर संभाषण दिनांक 06/11/2025 रोजीचे पंचनामा कार्यवाही मध्ये नमुद आहे.

त्यानंतर दिनांक 07/11/2025 रोजी हिंगणघाट येथील हिंगणघाट ते पिंपळगांव रोड वरील साई सुमिरण लॉन च्या पाठीमागे वेळ 10.40 वा. तक्रारदार व दोन्ही शासकीय पंच व सापळा पथकासह हजर असता तक्रारदार यांना वेळ 11.50 वा व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन तक्रारदार यांना गै.अ. यांना भेटण्यास पंच क्र. 1 सह तक्रारदार व पंच क्र. 1 यांना सुचना देवुन रवाना करण्यात आले. त्यानंतर थोडया वेळात तक्रारदार पंच क्र. 1 सह तक्रारदार यांचे जवळील दुचाकी वाहणाने परत आले. त्यानंतर पंच क्र. 1 यांचे आवाजात त्यांना दिलेल्या सुचने प्रमाणे त्यांनी व्हाईस रेकॉर्डर बंद केले. त्यानंतर पंच क्र. 1 यांनी आम्हास घडलेला घटनाक्रम सांगीतला की, ते गै.अ. यांचे भेटीस त्यांचे कार्यालयात गेले असता तेथे गै.अ. हे हजर नव्हते. त्यानंतर तक्रारदार यांनी तेथील हजर असलेल्या कर्मचारी यांना

गै.अ. यांचे बाबत विचारणा केली असता ते कार्यालयात हजर नसल्याबाबत माहिती झाली. त्यानंतर तक्रारदार यांनी गै.अ. यांचे मोबाईल क्रमांकावर कॉल केला असता गै.अ. यांनी तक्रारदार यांचा कॉल रिसीव्ह केला नसल्याने तक्रारदार पंच क्र. 1 सह परत आल्याबाबत पंच क्र. 1 यांनी आम्हास पंच क्र. 2 यांचे समक्ष सांगीतले. त्यानंतर आम्ही सदरची व्हॉईस रेकॉर्डीग दोन्ही पंचांचे समक्ष ऐकली असता पंच क्र. 1 यांनी सत्य परिस्थीती कथन केल्याचे दिसले. व्हाईस रेकॉर्डीग मधील संभाशणाची संविस्तर स्क्रीप्ट तयार करुन पंचनामा मध्ये नमुद करण्यात आली आहे. त्यानंतर तक्रारदार यांचे विनंतीवरुन तक्रारदार यांनी गै.अ. यांचे व्हॉट्सअँप क्रमांक वर त्यांचे कामाचे संबंधाने मॅसेज केला असता गै.अ. यांनी त्यावर रिप्लाय करुन त्यात एका व्यक्तीचा मोबाईल क्रमांक पाठविला. त्यानंतर थोडया वेळाने गै.अ.यांनी तक्रारदार यांना पाठविलेल्या मोबाईल क्रमांकावरुन तक्रारदार यांना फोन आला व त्यांनी तक्रारदार यांना मी संकेत विटाळे रा. सावली वाघ हिंगणघाट असे बोलत असुन मला तुमच्या कडुन 2000/- रुपये घेण्यास नाईक साहेबांनी सांगीतले आहे. त्यानंतर त्यांनी कॉल कट करुन तक्रारदार यांचे मोबाईल क्रमांकावर स्कॅनर पाठविला. सदरची माहिती आम्हास तक्रारदार यांनी दोन्ही पंचांचे समक्ष दिली असता आम्ही खाजगी इसम संकेत विटाळे यांची लाच मागणी संबंधाने पडताळणी करण्याचा निर्णय घेतला.त्यानंतर आम्ही तक्रारदार यांचे मोबाईल क्रमांकावरुन खाजगी इसम श्री. संकेत विटाळे यांचे मोबाईल फोन वर कॉल करुन दोघांमधील संभाषण व्हॉइस रेकॉर्डर व्दारे रेकॉर्ड करण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर आम्ही व्हाईस रेकॉर्डर मध्ये वेळ 14.13 वा सुरू करून संकेत विटाळे यांना तक्रारदार यांचे मोबाईल क्रमांका वरुन कॉल करुन मोबाईल कॉल स्पीकरवर ठेवुन सदरचे संभाषण रेकॉर्ड केले असता खाजगी इसम श्री. संकेत विटाळे यांनी तक्रारदार यांना गै.अ. श्री. नाईक यांचे करीता 2000/- रुपये स्विकारण्याची तयारी दर्शविली. संकेत विटाळे यांनी तक्रारदार यांना 2000/- रुपये ऑनलाईन टाकण्यास सांगीतले असता तक्रारदार यांनी त्यांचेकडे ऑनलाईन पेंमेंट होत नाही माझेकडे कॅश आहे असे सांगुन खाजगी इसम श्री. संकेत विटाळे यांना भेटण्यास सांगीतले असता श्री. संकेत विटाळे यांनी मी शेतात असुन मी दुस-या व्यक्तीला पैसे घेण्यास पाठवितो असे म्हटले असता तक्रारदार यांनी तुम्ही हिंगणघाट येथे या आपण भेटुन बोलु व तुमच्या कडेच पैसे देतो असे म्हटल्यावर खाजगी इसम यांनी तक्रारदार यांना मला थोडा वेळ लागेल असे हिंगणघाट येथे आल्यावर कॉल करतो असे म्हटले व कॉल ठेवुन दिला. सदरचे संभाषण आम्ही व्हॉईस रेकॉर्डर मध्ये रेकॉर्ड केले असुन सदरचे संभाषणाची आम्ही संविस्तर स्क्रीप्ट तयार केली असुन वेगळ्या पंचनामा कार्यवाही मध्ये नमुद आहे.त्यानंतर आम्ही गै.अ. श्री. नाईक व खाजगी इसम संकेत विटाळे यांचा कॉल येण्याची वाट पाहत थांबुन होतो. परंतु अद्यापपावेतो तक्रारदार यांचे मोबाईलवर फोन किंवा मॅसेज न आल्याने सदरची कार्यवाही ही तात्पुरती स्थगीत करण्यात आली.त्यानंतर दिनांक 10/11/2025 रोजी हिंगणघाट जवळील नंदोरी रोड वरील हॉटेल गारवा समोरील गोडावुन जवळ येथे तक्रारदार यांची भेट घेवुन तक्रारदार व पंच क्र. 1 यांना व्हॉईस रेकॉर्डर वेळ 10.36 वाजता चालु करुन गै.अ. यांचे मोबाईल क्रमांकावर कॉल करुन त्यांना लाच मागणी पडतळणी संबंधाने भेटण्याबाबत विचारणा केली असता गै.अ. यांनी पंधरा मिनीट मध्ये सरकारी दवाखाना चौक हिंगणघाट येथे भेटण्याबाबत कळविले व कॉल ठेवुन दिला. त्यानंतर पंच क्र. 1 यांचे आवाजात व्हाईस रेकॉर्डर बंद करण्यात आले. व्हाईस रेकॉर्डर मधील तक्रारदार व गै.अ. यांचे मधील संभाषण संविस्तर पंचनामा कार्यवाही मध्ये नमुद आहे.त्यानंतर गै.अ. यांनी तक्रारदार यांना भेट घेण्याकरीता सरकारी दवाखाना चौक येथे बोलावल्याने तक्रारदार यांना पंच क्र. 1 यांचे सह व्हॉईस रेकॉर्डर चालु वेळ 10.55 वाजता तक्रारदार व पंच क्र. 1 यांना सुचना देवुन रवाना करण्यात आले. त्यानंतर थोडया वेळात तक्रारदार व पंच क्र. 1 हे आम्ही थांबुन असलेल्या ठिकाणी परत आले. व पंच क्र. 1 यांना दिलेल्या सुचने प्रमाणे पंच क्र 1 यांनी संभाषण करुन व्हाईस रेकॉर्डर वेळ 11.28 वाजता बंद करण्यात आले. त्यानंतर आम्ही पंच क्र. 1 यांना घटनाक्रम विचारला असता पंच क्र. 1 यांनी सांगीतले की, तक्रारदार व गै.अ. यांचे मध्ये कामाचे संबंधाने बोलणी झाली परंतु गै.अ. यांनी लाच स्विकारण्याची तयारी दर्शविली असुन लाच रक्कमेबाबत स्पष्ट उल्लेख केला नसुन तुमच्या मनाने दया असे वारंवार म्हणुन लाच स्विकारण्याची तिव्र ते तिव्र इच्छा दर्शवुन निघुन गेल्याचे पंच क्र. 1 यांनी आम्हास सांगीतले. व्हाईस रेकॉर्डर मध्ये रेकॉर्ड झालेले संभाषण आम्ही ऐकुन त्यांची संविस्तर स्क्रीप्ट पंचनामा मध्ये नमुद करण्यात आली आहे.त्यानंतर आम्ही गै.अ. यांचा कॉल तक्रारदार यांना येण्याची वाट पाहत थांबुन राहलो. तक्रारदार यांचे मोबाईल क्रमांकावर गै.अ. तसेच खाजगी इसम यांना फोन किंवा व्हॉटसअँप वर मॅसेज न आल्याने आम्ही सदरची कार्यवाही तात्पुरती स्थगीत करुन तक्रारदार व पंच क्र. 1 व 2 यांना संविस्तर सुचना दिल्या. त्यानंतर दिनांक 11/11/2025 रोजी हिंगणघाट येथील शाहलंगडी रोड वरील पंचमुखी हनुमान मंदिर जवळ तक्रारदार यांची दोन्ही शासकिय पंचासह भेट घेवुन तक्रारदार यांचे मोबाईल क्रमांकावरुन गै.अ. यांचे मोबाईल क्रमांकावर कॉल करुन सदरचे संभाषण रेकॉर्ड करण्याचा निर्णय घेवुन व्हॉईस रेकॉर्डर वेळ 14.18 वाजता सुरु करुन तक्रारदार यांचे मोबाईल क्रमांक वरुन गै.अ. यांना कॉल करुन कॉल स्पिकर वर ठेवुन तक्रारदार व गै.अ. यांचे मधील संभाषण व्हॉईस रेकॉर्डर मध्ये रेकॉर्ड करण्यात आले असुन त्यात तक्रारदार यांना गै.अ. यांनी पंधरा

मिनीट मध्ये नंदोरी चौकात भेटायला येण्यास सांगीतल्याचे आम्ही दोन्ही पंचांना ऐकले. त्यानंतर गै.अ. यांनी फोन ठेवल्यानंतर पंच क्र. 1 यांचे आवाजात व्हॉईस रेकॉर्डर बंद करण्यात आले. आम्ही व्हॉईस रेकॉर्डर मधील तक्रारदार व गै.अ. यांचे मध्ये झालेले फोनव्दारे संभाषण ऐकुन सदर संभाषणाची संविस्तर स्क्रीप्ट तयार करण्यात आली असुन सदरची स्क्रीप्ट पंचनामा मध्ये नमुद आहे.त्यानंतर गै.अ. यांनी तक्रारदार यांना नंदोरी चौक येथे भेटण्यास बोलावल्याने तक्रारदार यांना पंच क्र. 1 सह व्हॉईस रेकार्डर वेळ 14.36 वाजता तक्रारदार यांचे जवळील दुचाकी वाहणाने रवाना करण्यात आले. काही वेळात तक्रारदार पंच क्र. 1 यांचे सह तक्रारदार यांचे जवळील दुचाकी वाहणाने परत आले. त्यानंतर आम्ही पंच क्र. 1 यांचे सह परत आल्याचे नंतर आमचे सुचने वरुन पंच क्र. 1 यांनी घटनाक्रम कथन केला व पंच क्र. 2 यांचे समक्ष आम्हास सांगीतले की, तक्रारदार व गै.अ. यांचे मध्ये तक्रारदार यांचे प्रलंबित सबसीडीच्या कामाच्या संबंधाने बोलणी झाली. बोलणी दरम्यान गै.अ. यांनी स्पष्ट लाचेची मागणी करुन तक्रारदार यांना 1000/- रुपये लाचेची मागणी करुन लाच रक्कम स्विकारण्याची तयारी दर्शविली होती. तक्रारदार यांनी त्यांचेकडे पैसे नसुन मी आपणास थोडया वेळानी आणुन देतो असे तक्रारदार यांनी गैअ. यांना सांगीतले व आम्ही तेथुन आपण थाबुन असलेल्या ठिकाणी परत आलो. असे पंच क्र. 1 यांनी आम्हास पंच क्र. 2 व तक्रारदार यांचे समक्ष सांगीतले. आम्ही तक्रारदार व गै.अ. यांचे मधील वरील नमुद संभाषण असलेले व्हॉइस रेकॉर्डर मधील फाईल ऐकुन सदर फाईलची संविस्तर स्क्रीप्ट तयार करण्यात आली असुन पंचनामा मध्ये संविस्तर नमुद करण्यात आली आहे. त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना गै.अ. यांनी मागणी केल्या प्रमाणे लाच रक्कम सादर करण्यास सांगीतले असता तक्रारदार यांनी माझे घर इथेच असुन मी आपणास घरुन लाच रक्कम आणुन देतो असे सांगीतले वरुन तक्रारदार हे आमचे पासुन रवाना होवुन थोडया वेळातच तक्रारदार यांनी लाच रक्कम 1000/- रुपये ज्यात 500/- रुपये दराच्या 2 चलणी नोटा आमचे समक्ष हजर केल्या. त्यानंतर आम्ही पंच क्र. 1 यांना सदर नोटांचे क्रमाक वाचण्यास सांगुन पंच क्र. 2 यांनी एका कागदावर सदर नोंटांचे क्रमांक नमुद केले व त्यावर दोन्ही पंच व आम्ही त्यावर सही केली. नमुद नोटांचे क्रमांक पंचनामा मध्ये नमुद करण्यात आले आहे.त्यानंतर तक्रारदार यांनी आमचे कडे लाच रक्कम म्हणुन दिलेल्या दोन 500/- रुपये दराच्या नोटांना सापळा पार्टीतील सदस्य पो.शि लक्ष्मण केंद्रे यांचे हस्ते आमचे सही व लेबल असलेल्या सिलबंद अँन्थ्रासीन चे बाटलीचे सिल काढुन पो.शि. लक्ष्मण केंद्रे यांचे हस्ते दोन्ही पचांचे समक्ष तक्रारदार यांना अँन्थ्रासीन पावडर च्या गुनधर्माविषयी माहिती देवुन प्रात्याक्षीक करुन दाखविले व वरील 500/- रुपये दराच्या दोन नोंटांना अँन्थ्रासीन पावडर लावुन सदरच्या नोटा एका को-या लिफाप्यामध्ये ठेवुन सदरचा लिफापा आम्ही आमचे ताब्यात ठेवला. सदर बाबत पंचनामा कार्यवाही मध्ये संविस्तर नोंदी घेण्यात आल्या आहे.त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना गै.अ. यांनी मागणी प्रमाणे अँन्थ्रासीन पावडर लावुन असलेली लाच रक्कम 1000/- ज्यात 500/- रुपये दराच्या 2 चलणी नोटा तक्रारदार यांचे शर्टच्या समोरील डाव्या बाजुच्या खिश्यात ठेवुन गै.अ. यांना भेटण्याकरीता पंच क्र. 1 यांचे सह व्हॉईस रेकार्डर चालु वेळ 15.12 वाजता तक्रारदार व पंच क्र. 1 यांना सुचना देवुन रवाना करुन आम्ही पंच क्र. 2 व सापळा पार्टीतील इतर सदस्यांसह शासकीय वाहणाने तक्रारदार यांचे दुचाकी वाहणाचे मागोमाग रवाना झालो. त्यानंतर तक्रारदार व पंच क्र. 1 असे अब्दुल्ला हाईटस येथे थांबले. त्यानंतर आम्ही सुध्दा सदर ठिकाणी शासकीय वाहण थोडया दुर अंतरावर उभे करुन वाहणातुन एक - एक उतरुन आजुबाजुला एक एकटयाने संशय न येता थांबुन राहुन हालचालीवर योग्य लक्ष देता येईल या प्रमाणे सापळा लावुन तक्रारदार यांच्या डोक्यातील टोपी डाव्या हाताने काढुन घेण्याचे नियोजीत इशा-याची वाट पाहात असतांना थांबुन होते. तक्रारदार यांनी आम्हास कोणताही नियोजीत ईशारा न देता आम्ही या आधी थांबुन असलेल्या ठिकाणी त्यांचे जवळी दुचाकी वाहणाने निघाल्याने आम्ही शासकीय वाहणात बसुन तक्रारदार यांचे मागोमाग शाहलंगडी हनुमान मंदिर येथे पोहोचलो व पंच क्र. 1 यांना दिलेल्या सुचने प्रमाणे व्हाईस रेकार्डर बंद करण्यात आले. त्यानंतर आम्ही पंच क्र. 1 यांना घटनाक्रम विचारला असता त्यांनी सांगीतले की, आम्ही आपले पासुन रवाना होवुन गै.अ. यांनी सांगीतलेल्या ठिकाणी गेलो होतो. तेथे तक्रारदार यांनी गै.अ. यांची वाट पाहत असतांना गै.अ. हे तेथे हजर न आल्याने तक्रारदार यांनी गै.अ. यांचे मोबाईल क्रमांकावर कॉल केला असता गै.अ. यांनी बाहेर आलो असुन मी तुम्हाला अर्धा तासाने कॉल करतो असे सांगीतल्याने आम्ही परत आलो. असे सांगीतले. त्यांनतर आम्ही व्हॉईस रेकॉर्डर मधील संभाषण ऐकुन त्याची संविस्तर स्क्रीप्ट पंचनामा कार्यवाही मध्ये करण्यात आली आहे. त्यानंतर आम्ही गै.अ. यांची तक्रारदार यांचे मोबाईलवर फोन येण्याची वाट पाहात होतो. दरम्यान तक्रारदार यांनी आम्हास जेवन करण्याविषयी विनंती केल्यावरुन तक्रारदार हे जेवन करत असतांना गै.अ. यांना तक्रारदार यांचे मोबाईलवर कॉल आला असता तक्रारदार यांनी कॉल उचलुन गै.अ. यांना मी जेवन करत आहे. आपल्याल्या थोडया वेळात कॉल करतो असे सांगीतल्याने गै.अ. यांनी कॉल ठेवुन दिला. अशी माहिती तक्रारदार यांनी आम्हास दिल्यावरुन आम्ही तक्रारदार यांना लाच रक्कमेसह गै.अ. यांना फोन करुन गै.अ. यांना भेटण्यास रवाना करण्याचा निर्णय घेतला. त्यावरुन आम्ही तक्रारदार यांना गै.अ. यांनी मागणी प्रमाणे अँन्थ्रॉसीन पावडर लावुन

असलेली लाच रक्कम 1000/- ज्यात 500/- रुपये दराच्या 2 चलणी नोटा तक्रारदार यांचे शर्टच्या समोरील डाव्या बाजुच्या खिश्यात ठेवुन गै.अ. यांना भेटण्याकरीता पंच क्र. 1 यांचे सह व्हॉईस रेकार्डर चालु वेळ 17.32 वाजता तक्रारदार यांना त्यांचे मोबाईल क्रमांकावरुन गै.अ. यांच्या मोबाईल क्रमांकावर कॉल करुन कॉल स्पीकरवर ठेवुन लाच रक्कम देण्याकरीता येण्याबाबत विचारणा केली असता तेव्हा गै.अ. यांनी मी आता वर्धे करीता निघालो आहे. आता आपण उदया पाहु असे म्हणुन गै.अ. यांनी कॉल ठेवुन दिला. त्यांनतर पंच क्र. 1 यांनी आम्ही दिलेल्या सुचने प्रमाणे संभाषण करुन व्हाईस रेकॉर्डीग बंद करण्यात आली. व्हॉइस रेकॉर्डर मधील तक्रारदार व गै.अ. यांचे मधील फोनव्दारे झालेले संभाषणाची संविस्तर स्क्रीप्ट तयार करण्यात आली असुन पंचनामा कार्यवाही मध्ये नमुद करण्यात आली आहे.

त्यानंतर दिनांक 12/11/2025 रोजी हिंगणघाट ते जाम राष्ट्रीय महामार्गवरील हिंगणघाट जवळील माउली पार्क येथे तक्रारदार यांना दोन शासकीय पंचांचे सह भेट घेवुन तक्रारदार यांना लाच रक्कमेसह गै.अ. यांची भेट घेणे करीता पाठविण्याचा निर्णय घेवुन आम्ही गै.अ. यांचा तक्रारदार यांना फोन येण्याची वाट पाहत असतांना तक्रारदार यांचे मोबाईल क्रमांकावर गै.अ. यांचे मोबाईल क्रमाकावरुन कॉल आला असता तक्रारदार यांनी कॉल रिसीव्ह करुन आमचे व दोन्ही पंचांचे समक्ष स्पीकर ऑन करुन बोलणी केली असता गै.अ. यांनी तक्रारदार यांना कुठे आहे असे म्हणुन नंदोरी चौक येथे बोलावुन घेतले.त्यानंतर आम्ही शासकीय वाहणात असलेल्या ट्रॅपबॅग मधुन अँन्थ्रासीन पावडर लावुन असलेली लाच रक्कम ज्यात 500/- रुपये दराच्या दोन चलणी नोटा एकुन 1000/- रुपये लिफापा बाहेर काढुन तक्रारदार यांनी परिधान केलेल्या शर्टचे समोरील डाव्या बाजुच्या खिश्यात ठेवुन देवुन व्हॉईस रेकार्डर चालु वेळ 11.24 वाजता पंच क्र. 1 यांचे सह तक्रारदार यांचे जवळील दुचाकी वाहणाने रवाना करण्यात आले. त्यांचे मागोमाग आम्ही, पंच क्र. 2 व सापळा पथक असे शासकीय वाहणाने रवाना झालो. तक्रारदार यांनी त्यांचे वाहण हे नंदोरी चौक येथील राष्ट्रीय महामार्ग क्र. 44 चे पुलाखाली थांबविले. त्यानंतर आम्ही सुध्दा तक्रारदार यांचे पासुन काही अंतरावर आमचे शासकीय वाहण थांबवुन एक - एक सदस्य खाली उतरुन नंदोरी चौक येथे गै. अ. यांना संशय येणार नाही अशा प्रकारे गै.अ. यांचे हालचालीवर योग्य लक्ष ठेवुन तक्रारदार यांचे नियोजीत इशा-याची वाट पाहात थांबुन राहलो. त्यानंतर 11.31 मिनिटांनी तक्रारदार यांनी त्यांचे डोक्यावरील टोपी त्यांच्या डाव्या हाताने काढुन हातात घेवुन नियोजीत इशारा दिल्याने आम्ही, पंच क्र. 2 व सापळा पार्टी सदस्य असे गै.अ. यांच्या दिशेने जावुन आम्ही गै.अ. यांना ओळखपत्र दाखवुन आमचा परिचय देवुन सर्वांसमाक्ष पंच क्र. 1 यांना विचारणा केली की, लाच रक्कम कोणी घेतली व कोठे ठेवली. तेव्हा पंच क्र. 1 यांनी गै.अ. यांचेकडे बोट दाखवुन लाच रक्कम यांनी स्विकारुन स्वेटरचे आतील बाजुस शर्टचे समोरील डाव्या बाजुच्या खिश्यात ठेवली आहे असे सांगीतल्याने आम्ही गै.अ. श्री. नाईक यांना ताब्यात घेवुन पंच क्र. 1 यांना दिलेल्या सुचने वरुन व्हाईस रेकॉर्डर वेळ 11/34 वाजता बंद करण्यात आले. त्यानंतर आम्ही पंच क्र. 2 यांना दिलेल्या सुचनेवरुन पंच क्र. 2 यांनी गै.अ. यांनी अंगझडती घेतली. गै.अ. यांचे अंगझडती मध्ये गै.अ. यांनी परिधान केलेल्या स्वेटर च्या आत असलेल्या शर्ट च्या डाव्या बाजुच्या खिश्याचे आत 500 रुपये दराच्या 2 चलणी नोटा अशी एकुन 1000/- रुपये लाच रक्कम मिळुन आल्याने सदरची लाच रक्कम पडताळणी करुन पंच क्र. 2 यांचे ताब्यात ठेवुन देण्यात आली.

त्यानंतर नंदोरी चौक हा हिंगणघाट शहरातील वरदळीचा रस्ता तसेच गर्दीचे ठीकाण असल्याने सदर ठिकाणी बघना-या लोकांची गर्दी होत असल्याने आम्ही नंदोरी चौक येथुन पुढील कार्यवाही करणे करीता पोलीस स्टेशन हिंगणघाट येथे रवाना झालो. गै.अ. यांचे जवळी मोटार सायकल क्र. एम.एच 32 ए.एल. 7595 ही सदर गुन्हयात जप्त करणे असल्याने आम्ही सापळा पथकातील पो.शि मनिष मसराम यांना घेवुन येण्याबाबत सुचना दिली. त्यानंतर आम्ही तक्रारदार यांचे कडुन गै.अ. यांनी स्विकारलेली लाच रक्कम ज्यात 500/- रुपये दराच्या 2 चलणी नोटा एकुण 1000/- रुपये लाच रक्कम, गैअ. यांनी घटनेवेळी परिधान केलेला काळसर रंगाचा स्वेटर व त्याखाली फुल बाहीचा पांढ-या रंगाचा शर्ट ज्याला डाव्या बाजुने खिसा असलेला गै.अ. यांनी लाच रक्कम स्विकारुन शर्टचे डाव्या बाजुच्या खिश्यात ठेवल्याने व लाच रक्कम ठेवते वेळी अँन्थ्रासीन पावडर गै.अ. यांचे काळया रंगाच्या स्वेटर ला लागल्याने सदरचे स्वेटर, गै.अ. यांचे कडील विवो कंपनिचा मोबाईल किंमत अंदाजे 8000/- रुपये, तक्रारदार यांचे कामाच्या संबंधांन असलेले गैअ. यांचे बॅग मधील कागदपत्रे एकुण पाने 2, गैअ. यांनी गुन्हयात वापरलेली मोटार सायकल क्र. एम.एच 32 ए.एल. 7595, खाजगी इसम संकेत विटाळे यांचा रेडमी कंपनीचा मोबाईल किंमत अंदाजे 6000/- रुपये तसेच लाच मागणी पडताळणी व सापळा कार्यवाही करीता वापरण्यात आलेले मेमरी कार्ड एकुण 6 मेमरी कार्ड सदर गुन्हयात संविस्तर जप्तीपत्रक तयार करुन जप्त करण्यात आले आहे.सदर सापळा कार्यवाही मधील खाजगी इसम संकेत विटाळे यांनी गै.अ. यांचे करीता लाच रक्कम 2000/- रुपये तक्रारदार यांना फोनव्दारे मागणी करुन तक्रारदार यांना गै.अ. यांचे कडुन मागणी बाबत प्रोत्साहन देवुन तक्रारदार यांचे कडुन लाच रक्कम घेण्याकरीता गै. अ. यांना सहकार्य केले असुन सदर खाजगी इसम यांची गुन्हयात आवश्यकता असल्याने ताब्यात घेणेकामी शोध

मोहिमेचे आयोजन करुन वरिष्टांच्या मार्गदर्शनात खात्रीलायक गोपनिय बातमीदार नेमुण शोध घेणे करीता परिसरात रवाना होवुन प्रयत्न करीत असतांना पोलीस उपअधिक्षक मा. राकेश साखरकर सा. यांना मिळालेल्या गोपनिय माहितीनुसार सदरचा खाजगी इसम हा नंदोरी रोडने सावली वाघ शिवारात संशयीतरीत्या फिरतांना दिसुन आल्याचे खात्रीलायक मिळालेल्या माहितीनुसार योग्य प्रतिसाद देवुन तातडीने आवश्यक बळासह पोहोचुन योग्य पध्दतीने सापळा रचुन संबंधीत खाजगी इसमास ताब्यात घेवुन त्यास योग्य कारनमिमांसा करुन पुढील योग्य त्या कायदेशीर कार्यवाही करीता सापळा कार्यवाही पथक थांबुन असलेल्या ठिकाणी घेवुन येवुन आमचे ताब्यात दिले. तरी आरोपी लोकसेवक श्री. बाबाराव उत्तमराव नाईक, वय 47 वर्ष, पद - कृषी पर्यवेक्षक,मंडळ कृषी अधिकारी कार्यालय हिंगणघाट जिल्हा वर्धा, कृषी विभाग वर्ग -3 रा. बालोद्यान जवळ, समता नगर, वर्धा यांनी तक्रारदार श्री. सुरेश दत्तात्रय निकोरे, वय 41 वर्ष, व्यवसाय शेती, रा. संत ज्ञानेश्वर वार्ड, शाहलंगडी रोड, हिंगणघाट तह. हिंगणघाट जि. वर्धा यांना महाराष्ट्र कृषी यांत्रीकीकरण योजणे अंतर्गत कडबा कुटी यंत्रावर (चाप कटर) शासकीय अनुदान मिळणे करीता लोकसेवक यांनी धारण केलेल्या पदाचा दुरुपयोग करुन आपला आर्थीक फायदा करुन घेण्याकरीता 1000/- रुपये लाच रक्कमेची मागणी करुन तक्रारदार यांचे कडुन 1000/- रुपये लाच रक्कम पंचासमक्ष स्विकारतांना रंगेहात मिळुन आले तसेच खाजगी इसम श्री. संकेत घनशाम विटाळे, वय 25 वर्श, व्यवसाय शेती रा. सावली वाघ तह. हिंगणघाट जि. वर्धा यांनी आरोपी लोकसेवक यांचे कडील प्रलंबित कामा करीता लाच रक्कमेची मागणी करुन तक्रारदार यांचे कडुन 2000/- रुपयांची लाच रक्कम स्विकारण्याची तयारी दर्शवुन गुन्हयास प्रोत्साहन दिले असुन भ्रष्ट्राचार प्रतिबंध अधिनियम 1988 सुधारीत अधिनियम सन 2018 अंतर्गत गुन्हा केल्याने माझी त्याचे विरुध्द शासनतर्फे कायदेशीर फिर्याद आहे. (श्री.संदिप मुपडे)पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वर्धा

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (**केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.**)**

(1) **Registered the case and took up the investigation:**
**(**प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले**):**

DEVENDRA MATAPHERSINGH THAKUR(I (Inspector)) /

**or (**किंवा**)**

(2) **Directed (Name of I.O.) (**तपास अधिका-याचे नाव**):**

**Rank (**पद**):**

**No.(**क्र.**):**

**to take up the Investigation (**ला तपास करण्याचे अधिकार दिले**) or (**किंवा**)**

(3) **Refused investigation due to (**ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला**):**

**or (**ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला**)**

(4) **Transferred to P.S.**
**(**गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव**):**

**District (**जिल्हा**):**

**on point of jurisdiction (**को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित**) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (**प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.**)**

**R.O.A.C.(**आर. ओ .ए .सी.**)**

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

15. **Date and time of dispatch to the court**
**(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

**Signature of Officer in charge, Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** DEVENDRA MATAPH
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):**

स्टे. डा. अमलदार
पोलीस स्टेशन, हिंगणघाट